# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 04 April 2024

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०४ एप्रिल २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस
- हिंगोली लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार हेमंत पाटील यांच्याऐवजी बाबुराव पाटील कोहळीकर यांना उमेदवारी
- निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय सीमांवर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्याचे निवडणूक आयोगाचे सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश
- नांदेड जिल्ह्यातल्या दोन लाखाहून अधिक महिलांची शंभर टक्के मतदान करण्याची शपथ

आणि

- छत्रपती संभाजीनगर शहरात छावणी परिसरातल्या एका कापड दुकानाला लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातल्या सात जणांचा मृत्यू

****

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. या टप्प्यात १२ राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातल्या ८८ मतदारसंघात मतदान होईल. यामध्ये राज्यातल्या नांदेड, परभणी, हिंगोली, अकोला, वर्धा, अमरावती, बुलढाणा आणि यवतमाळ – वाशिम या मतदारसंघांचा समावेश आहे. उद्या उमेदवारी अर्जांची छाननी होणार असून, दुसऱ्या टप्प्यासाठी येत्या २६ एप्रिलला मतदान होणार आहे.

****

नांदेड लोकसभा मतदारसंघात काल नऊ अर्ज दाखल झाले असून, आतापर्यंत १९ उमेदवारांचे २० अर्ज दाखल झाल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी अभिजीत राऊत यांनी दिली. काँग्रेसचे उमेदवार वसंतराव चव्हाण यांनी काल शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज भरला. यावेळी माजी मंत्री अमित देशमुख उपस्थित होते.

परभणी लोकसभा मतदार संघात काल ११ उमेदवारांनी १२ अर्ज दाखल केले. यामध्ये स्वाभिमानी पक्षाचे किशोर ढगे यांचा समावेश आहे. या मतदारसंघात आतापर्यंत एकूण १९ अर्ज दाखल झाले आहेत.

हिंगोली लोकसभा मतदारसंघात काल १२ उमेदवारांनी १६ अर्ज दाखल केले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार नागेश पाटील आष्टीकर यांनी उमेदवारी अर्ज भरला. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यावेळी उपस्थित होते. माहूर गडाचे महंत भारती महाराज यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला.

अकोला लोकसभा मतदारसंघात भाजपचे महायुतीचे उमेदवार अनुप धोत्रे यांनी काल उमेदवारी अर्ज भरला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महायुतीच्या घटकपक्षातले नेते यावेळी उपस्थित होते.

वर्धा इथं भाजपचे उमेदवार रामदास तडस यांनी फडणवीस यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज भरला.

अमरावती इथं प्रहार पक्षाचे उमेदवार दिनेश बुब यांनी पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला.

यवतमाळ लोकसभा मतदारसंघात काल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संजय देशमुख यांच्यासह चार उमेदवारांनी अर्ज दाखल केले. तर बुलडाणा लोकसभा मतदारसंघात काल सहा उमेदवारांनी अर्ज भरले.

****

हिंगोली लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार विद्यमान खासदार हेमंत पाटील यांच्याऐवजी हदगावचे बाबुराव पाटील कोहळीकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. हेमंत पाटील यांनी उमेदवारी अर्ज देखील दाखल केला आहे, मात्र काही आमदार आणि पदाधिकाऱ्यांच्या नाराजीनंतर बाबुराव पाटील यांना उमेदवारी जाहीर झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. बाबुराव पाटील कोहळीकर आज आपला उमेदवारी अर्ज भरणार आहेत.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं काल चार उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. कल्याण लोकसभा मतदारसंघातून वैशाली दरेकर, पालघर – भारती कामडी, जळगाव – करण पवार आणि हातकणंगले मतदारसंघातून सत्यजित पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

दरम्यान, जळगावचे भारतीय जनता पक्षाचे खासदार उन्मेष पाटील यांनी काल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.

****

बळीराजा पक्षानेही काल सात उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. लातूर लोकसभा मतदारसंघातून शंकर तडाखे, तर परभणीतून कैलास पवार यांना उमेदवारी देण्यात आली आहे. रामटेक इथून संविधान लोखंडे, मावळ– संभाजी गुणाट, हातकणंगले – शिवाजीराव माने, तर सांगली इथून आनंदराव नालगे –पाटील यांना उमेदवारी घोषित करण्यात आल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब रास्ते यांनी सांगली इथं दिली.

****

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी भारत भ्रमण करुन समाजातल्या सर्व घटकांशी चर्चा केली, त्यांना न्याय मिळावा, यादृष्टीनं पाच न्याय आणि २५ गॅरंटी जाहीर केल्या असून, त्यांचा राज्यात घरोघरी जाऊन प्रचार करणार आहोत, असं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी सांगितलं. काल मुंबईत काँग्रेसची प्रचार समिती आणि समन्वय समितीच्या बैठकीनंतर ते बोलत होते. महिला, युवा, कामगार, शेतकरी, हिस्सेदार यांना प्राधान्यानं न्याय मिळावा अशी यामागची भूमिका असल्याचं ते म्हणाले.

****

रामटेक मतदार संघात येत्या १० तारखेला महायुतीच्या एका भव्य सभेचं आयोजन कऱण्यात आलं असून, या सभेचा आढावा घेण्यासाठी उद्योग मंत्री उदय सामंत रामटेक आज विदर्भाच्या दौऱ्यावर आहेत. विदर्भातल्या दहा लोकसभा मतदार संघाचा आढावा घेता, इथले विरोधातले सर्व उमेदवार निष्प्रभ झाले असून, या सर्व जागा महायुती जिंकेल, असा विश्वास सामंत यांनी व्यक्त केला.

****

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय सीमांवर अवैध दारू, रोख रक्कम, अंमली पदार्थ आणि मोफत वस्तुंचा ओघ

रोखण्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्याचे निर्देश निवडणूक आयोगानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. आयोगानं या संदर्भात सर्व राज्यातले मुख्य सचिव, पोलीस महानिदेशकांबरोबर काल नवी दिल्ली इथं आढावा बैठक घेतली. तसंच महाराष्ट्रासह ११ राज्यातल्या संवेदनशील मतदान केंद्रावर केल्या जाणाऱ्या विशेष व्यवस्थेसंदर्भातही चर्चा केली.

****

नांदेड जिल्ह्यात वडेपूरी इथं काल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या उपस्थितीत महिला बचत गटांसाठी मतदार शपथ कार्यक्रम घेण्यात आला. लोकशाही बळकटीकरणासाठी महिलांनी मोठ्या प्रमाणात मतदानासाठी पुढे यावं, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं. या मोहिमेअंतर्गत आज जिल्ह्यातल्या प्रत्येक गावात सुमारे दोन लाखाहून अधिक महिलांनी शंभर टक्के मतदान करण्याची शपथ घेतली.

****

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १८७ सहाय्यकारी मतदान केंद्रांच्या प्रस्तावास निवडणूक आयोगानं मान्यता दिली आहे. त्यामुळे आता जिल्ह्यातल्या मतदान केंद्रांची संख्या तीन हजार ८५ झाली असल्याची माहिती, उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके यांनी दिली.

****

काँग्रेस नेते आणि माजी खासदार संजय निरूपम यांची काँग्रेस पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षविरोधी वक्तव्यं आणि शिस्तभंगांच्या तक्रारीनंतर, पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी निरूपम यांना पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्याचा निर्णय घेतल्याचं काँग्रेसचे सरचिटणीस के.सी.वेणुगोपाल यांनी यासंदर्भातल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

****

छत्रपती शिवाजी महाराजांच्या तीनशे चौव्वेचाळीसाव्या पुण्यस्मरण दिनानिमित्त काल धाराशिव इथं शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीनं रक्तदान शिबिर घेण्यात आलं. नागरीकांचा या शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

****

छत्रपती संभाजीनगर शहरात छावणी परिसरातल्या एका कापड दुकानाला भीषण आग लागून एकाच कुटुंबातल्या सात जणांचा मृत्यू झाला. काल पहाटे ही घटना

घडली. कपड्याच्या दुकानात चार्जिंगला लावलेल्या इलेक्ट्रिक बाईकच्या चार्जरचा स्फोट झाल्यानं ही आग लागल्याचं अग्नीशमन दलानं सांगितलं. मृतांमध्ये दोन लहान मुलांचा समावेश आहे. दुकानाला आग लागली तेव्हा हे सर्व वरच्या मजल्यावर झोपलेले होते, त्यामुळे त्यांचा गुदमरून मृत्यू झाल्याचं स्पष्ट झालं आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात वसमत तालुक्यातल्या हट्टा जवळील चिखली फाटा इथं कार आणि दुचाकीच्या अपघातात दुचाकीवरील आई आणि मुलाचा जागीच मृत्यू झाला. गयाबाई आणि शिवाजी भालेराव अशी मृतांची नावं असून, काल सकाळच्या सुमारास परभणीकडे जात असताना हा अपघात झाला.

****

हिंगोलीतल्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा वरिष्ठ तंत्रज्ञ लक्ष्मीकांत बिजलगावे याला चार हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकानं काल रंगेहाथ अटक केली. कृषी सोलार पॅनल बसवण्याचा सर्व्हे करून देण्यासाठी त्यानं ही लाच मागितली होती.

****

धर्माबाद –मनमाड मराठवाडा एक्सप्रेस येत्या सात आणि दहा एप्रिल रोजी धर्माबाद ते नांदेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. या दिवशी ही गाडी मनमाडला जाण्यासाठी धर्माबाद ऐवजी नांदेड इथून सुटेल. आदिलाबाद ते मुंबई नंदीग्राम एक्सप्रेस ही गाडी २८ एप्रिल पर्यंत दादरपर्यंतच धावणार आहे.

****

हवामान

राज्यात काल चंद्रपूर जिल्ह्यातल्या ब्रह्मपुरी इथं सर्वाधिक ४२ पूर्णांक तीन अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सोलापूर इथं ४२ अंश सेल्सिअस, बीड, परभणी तसंच नांदेड इथं सरासरी ४०, लातूर ३९ पूर्णांक आठ, तर छत्रपती संभाजीनगर इथं ३८ पूर्णांक सहा अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली.

दरम्यान, येत्या सहा आणि सात एप्रिल रोजी छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाची शक्यता हवामान खात्यानं व्यक्त केली आहे.

****